CMYK

तेव्हा लागलेली आग आज पण आहे मंत्री संजय शिरसाट यांची शिवसेनेवर टिका >> पान 2

जग कुठे चालले आणि तुम्ही कबरीच्या मागे फिरताय >> पान 3

पुणे येथील आरोग्य टीम बोंडगावात दाखल >> पान 4

**सुविचार**

वेळेचा आदर करा, कारण वेळेचे महत्त्व अमूल्य आहे.

दैनिक

# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 249 ■ मंगळवार, दि. 22 एप्रिल 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



सलमान खाननंतर आता टीव्ही अभिनेत्रीच्या पतीला धमकी! बिश्नोई गँगच्या रडारवर? आतील पान

## निवडणुका होईना, मनसेने मुंबईत भरवले प्रतिपालिका सभागृह; आदित्य ठाकरेंनाही निमंत्रण, महौपौर कोण?

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याच्या कारभारावर लक्ष ठेवण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून राज ठाकरेंच्या नेतृत्वात शाडो कॅबिनेटची स्थापना करण्यात आली होती. मात्र, मनसेचा शाडो कॅबिनेट पॅटर्न फेल झाल्यानंतर आता मुंबईत मनसे कडून ''प्रतिपालिका सभागृह'' भरवण्यात येणार आहे इथे २६ एप्रिल रोजी प्रतिपालिका सभागृहाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबई महानगरपालिकेचा कारभार सध्या प्रशासनाच्या वतीने चालवण्यात येतोय. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे लोकांच्या सम स्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत मनसेच्यावतीने हे प्रतिसभागृह भरवण्यात आलं आहे. त्यासाठी, मसनेचे सरचिटणीस संदीप देशपांडे यांच्याकडून मुंबईतील सर्वच राजकीय पक्षाच्या प्रमुखांना पत्र पाठवून सभागृहात उपस्थित राहण्याचे आवाहन देखील करण्यात आलं आहे.

# उष्णतेनं शहरं तापली! विदर्भात तीव्र उष्णतेची लाट कायम

## नागपूरच्या ३३ चौकांवरील सिग्नलवर आता थांबायची गरज नाही

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील बहुतांश भागात तापमानाचा भडका उडाला असल्याचे चित्र बघायला मिळात आहे. परिणामी उष्णतेमुळे नागरिकांची पूर्ती दैना झाली आहे. एरवी शहरातील कायम वर्दळीचे वाटणारे रस्तेही आता दुपारच्या वेळी सुनसान भासत असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे मागील २ दिवसांपासून विदर्भातील जिल्हे देशात सर्वात उष्ण तापमानात प्रथम असल्याचे पाहायला मिळत आहे. आज देखील चंद्रपूरात विदर्भातील सर्वाधिक ४४.६ अंश सेल्सिअस इतक्या तापमानाची नोंद झाली आहे. तर पुढील ३ दिवस नागपूर,चंद्रपुर अकोला, अमरावती आणि वर्ध्यात तीव्र उष्णतेची लाट कायम असल्याचा इशारा नागपूर प्रादेशिक हवामान विभागाने (आयएमडी) दिला आहे. संभाव्य इशारा लक्ष्यात घेता योग्य ती खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.**

दरम्यान, राज्याची उपराजधनी नागपुरातही तापमानाने नवे उच्चांक गाठले आहे. अशातच नागपूरच्या ३३ चौकांवर दुपारी एक ते चार सिग्नल रेड ब्लिंकरवर वाहन चालकांना सिग्नल वर थांबायची गरज नाही. कारण उन्हापासून वाचवण्यासाठी वाहतूक पोलिसांनी विशेष खबरदारी घेत ही योजना राबवली आहे.



सध्या वाढलेलं तापमान पाहता वाहन चालकांना खास करून दुचाकी स्वारांना उष्माघातापासून वाचवण्यासाठी नागपूर पोलिसांनी वेगळीच शक्कल लढवली आहे. दुपारी १ ते संध्याकाळी ४ वाजे दरम्यान नागपूरातील ३३ चौकांवरील सिग्नल रेड ब्लिंकरवर ठेवण्यात येत आहे. त्यामुळे सिग्नल वर पोहोचल्यानंतर वाहन चालकांना काही सेकंद थांबून अवतीभवतीच्या ट्रॅफिकची स्थिती पाहून पुढे जाता येत आहे.

सिग्नलवर बराच वेळ थांबून राहिल्यामुळे दुचाकी स्वरांना उष्माघाताचा धोका बळावतो. त्यात वृद्ध महिला आणि लहान बालकांना जास्त त्रास होतो. हे पाहून नागपूर पोलिसांनी दुपारी एक त्याच्यात ३३ चौकांवरील सिग्नल रेड ब्लिंकरवर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. तापमान यापेक्षा जास्त वाढल्यास रेड ब्लिंकर वरील सिग्नलची संख्याही वाढवली जाईल, तसेच वेळेत बदल करून दुपारी १२ ते संध्याकाळी पाच अशी केली जाईल. अशी माहिती नागपूरचे वाहतूक पोलीस उप आयुक्त अर्चित चांडक यांनी दिली आहे.

दरम्यान, विदर्भात २१ ते २३ एप्रिल दरम्यान उष्णतेच्या लाटेची शक्यता असल्याचा इशारा भारतीय हवामान विभागाकडून देण्यात आला आहे. यात अकोला, चंद्रपूर, नागपूर, वर्धा आणि यवतमाळमध्ये तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज आहे. मराठवाड्यात आज आणि उद्या काही ठिकाणी तापमान उष्ण आणि दमट राहणार असल्याचे ही सांगण्यात आलंय. तर संध्याकाळी मराठवाड्यातील काही जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## मेडिकल काऊन्सिलच्या सुनावणीस डॉ. घैसासांची दांडी, भिसे कुटुंबियांची मोठी मागणी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :**दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील तनिषा भिसे मृत्यू प्रकरणाची आज मेडिकल काऊन्सिल येथे सुनावणी पार पडली. या सुनावणीसाठी डॉ. सुश्रुत घैसास हे गैरहजर होते. डॉ. घैसास यांनी ई-मेलद्वारे मेडिकल काऊन्सिलला मी येऊ शकत नाही, असे कळवले. तर भिसे कुटुंबीय आजच्या सुनावणीला उपस्थित होते. त्यांनी काऊन्सिलपुढे त्यांच्या जवळ असणारे सर्व रिपोर्ट आणि पुरावे सादर केले. तसेच भिसे कुटुंबियांनी काऊन्सिल काही महत्त्वाच्या मागण्या देखील केल्या आहेत.

सुनावणीनंतर भिसे कुटुंबीयांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी भिसे कुटुंबीय म्हणाले की, आम्ही आज इथे हेअरिंगसाठी आलो होतो. तनिषा भिसे हिची खोटी माहिती प्रसारित केल्याबद्दल आम्ही माहिती दिली. आम्हाला पुढच्या हेअरिंगल बोलावले आहे. घैसास आले नाहीत, त्यांनी वैद्यकीय समितीला कळवलं आहे. वैद्यकीय लायसन्स रद्द करण्याची प्रक्रिया सुरु करावी. शिस्तभंगाची कारवाई करावी. ट्रस्टच्या प्रशासनावर कारवाई करावी, जेणेकरून भविष्यात कुठल्याही कुटुंबाला अमानवीय त्रास सहन करावा लागू नये, असा मागण्या आम्ही त्यांच्यासमोर सादर केल्या आहेत.

डॉ. घैसास यांना ई-मेल द्वारे कळवलं की, मे येऊ शकत नाही. आम्हाला जर पुन्हा बोलावले तर आम्ही बाजू मांडण्यासाठी आम्ही येऊ. काऊन्सिलपुढे आम्ही आमच्या जवळ असणारे, सर्व रिपोर्ट आणि पुरावे ठेवले आहेत. हॉस्पिटल ट्रस्टकडून चुकीचे पुरावे दाखवले गेले, हे आम्हाला निदर्शनास आले आहे. त्याबाबत आम्ही आमचा अंतर्गत अहवाल सादर केला आहे. त्यावर कारवाई व्हावी.

डॉक्टरांनी कशी जाणूनबुजून ट्रीटमेंट दिली नाही म्हणून त्यांचा मृत्यू झाला. कौन्सिलकडून जे प्रश्र्न विचारले त्याला आम्ही प्रत्येक गोष्टीत पुरावे सादर केले आहे. काऊन्सिलकडून आश्र्वासन देण्यात आलं नाही. डॉ. घैसास यांना अटक व्हावी, ही आमची प्राथमिक मागणी आहे. आम्ही काऊन्सिलला घटनाक्रम सांगितला आहे.

## शिवनेरी किल्ल्यावर मधमाशांचा पाचव्यांदा पर्यटकांवर हल्ला!

**पुणे/प्रतिनिधी :** शिवनेरी किल्ल्यावर पुन्हा एकदा पर्यटकांवर मधमाशांनी हल्लाबोल केला आहे. या हल्ल्यात १६ जण जखमी झाले असून पाच बालकांचा यात समावेश आहे. या आधीही शिवनेरीवर चार वेळा अशाप्रकारचा हल्ला मधमाशांनी पर्यटकांवर केला होता. पुण्यातील शिवनेरी किल्ल्याचा इतिहास सर्वदूर पसरलेला आहे. शिवनेरी किल्ल्यावर सुट्टीच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर पर्यटक पर्यटनासाठी येतात. शुक्रवार, शनिवार, रविवार या जोडून आलेल्या सुट्ट्यांचा आनंद लुटण्यासाठी पर्यटकांनी शिवनेरी किल्ल्यावर पर्यटन करण्यास पसंती दर्शवली. रविवारी पर्यटकांची तुलनेने जास्त गर्दी होती. या गर्दीत मोठ्यांसह लहानांचा देखील समावेश होता. रविवारी सकाळच्या सुमारास पर्यटनाचा आनंद घेणाऱ्या पर्यटकांवर झाडावर असलेल्या मधमाशांनी हल्ला केला. या हल्ल्यात १६ पर्यटक गंभीर जखमी झाले. या मध्ये पाच लहान मुलांचा देखील समावेश आहे. सकाळी मधमाश्यांच्या हल्ल्याच्या घटनेनंतर काही काळ शिवभक्तांना किल्ल्यावर जाण्यासाठी मज्जाव करण्यात आला होता.

## बडतर्फ रणजीत कासलेच्या पोलीस कोठडीत वाढ

**बीड/प्रतिनिधी :** संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याच्या एन्काउंटरचा कट रचल्याचा आरोप करणारी व थेट मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर बोट ठेवणारी एक चित्रफीत निलंबित पोलीस अधिकारी रणजित कासले याने समाजमाध्यमांवर प्रसारित केली होती. या प्रकरणामुळे राज्यभरात मोठी खळबळ उडाली होती. यानंतर काही दिवसांपूर्वी रणजित कासलेला पुण्यातून अटक करण्यात आली होती. तर कासले विरोधात शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अ‍ॅट्रॉसिटीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. आता या प्रकरणात रणजित कासलेला २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

आज सोमवारी (दि. २१) रणजित कासलेला बीडच्या जिल्हा सत्र न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी पोलिसांनी रणजित कासलेच्या १० दिवसांच्या कोठडीची मागणी केली होती. कारण शिवाजीनगर पोलीस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याचा तपास अजूनही सुरू



आहे. विशेषतः कासलेच्या मोबाईलमधील महत्त्वाचा डेटा रिकव्हर करणे आणि त्याने वापरलेले वाहन ताब्यात घेणे गरजेचे असल्याने पोलिसांनी १० दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. मात्र, बीडच्या जिल्हा सत्र न्यायालयाने त्याला २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

विशेष बाब म्हणजे, कासलेला कोर्टातून बाहेर नेत असताना त्याने पुन्हा एकदा दोन्ही हातांनी 'व्हिक्टरी साइन' दाखवली. याआधीच्या सुनावणीवेळीही त्याने अशाच प्रकारे व्हिक्टरी साइन केल्याचे दिसून आले होते. आता रणजीत कासलेला २३ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. आता न्यायालयात पुढील सुनावणीत नेमकं काय होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, धनंजय मुंडे आणि राज्य सरकारवर थेट आरोप करणाऱ्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासलेविरोधात आणखी एक नवीन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अंबाजोगाईतील व्यापारी सुधीर चौधरी यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, कासलेने आईच्या उपचारासाठी म्हणून सहा लाख रुपये उसने घेतले होते. मात्र, वारंवार मागणी करूनही त्यांनी ते पैसे परत न केल्याने अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात त्याच्याविरोधात फसवणुकीचा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. रणजीत कासले आणि सुधीर चौधरी यांच्यात अंबाजोगाई येथे कासले कार्यरत असताना मैत्री झाली होती. या नात्यावर विश्र्वास ठेवून चौधरी यांनी आर्थिक मदत केली होती. मात्र पैसे परत न मिळाल्याने अखेर त्यांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली. गेल्या काही दिवसांत कासलेविरोधात दाखल झालेला हा तिसरा गुन्हा आहे. यापूर्वी त्याच्यावर परळी आणि अंबाजोगाई येथे गुन्हे दाखल आहेत.

## माढ्यात सावंत कुटुंबातील वाद चव्हाट्यावर, निमंत्रण पत्रिकेत तानाजी सावंतांचे नावच नाही, एकनाथ शिंदेंची कार्यक्रमाकडे पाठ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्याचे माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत हे सोलापूर जिल्ह्यातील एक बडे प्रस्थ असली तरी त्यांच्या कुटुंबातील वाद विधानसभा निवडणुकीनंतर प्रकर्षाने समोर येऊ लागले असून आज माढा येथे त्यांचे ज्येष्ठ बंधू व सोलापूर जिल्हा शिवसेना संपर्कप्रमुख प्राध्यापक शिवाजी सावंत यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हजेरी लावणार होते. या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकेत तानाजी सावंत यांचे नावच नसल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील अचानक या कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याने अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत.

आज माढा येथे शिवाजीराव सावंत यांचे पुत्र पृथ्वीराज सावंत यांच्या राजवी ऑइल इंडस्ट्रीचे भूमिपूजन एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होत असून यानंतर शिवसेनेचा मेळावा पार पडणार आहे. या कार्यक्रमात माजी आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे नाव नसल्याने चर्चेला सुरुवात झाली आहे.

वास्तविक विधानसभा निवडणुकीच्या वेळेला प्राध्यापक शिवाजी सावंत हे सोलापूर मध्यमधून निवडणूक लढविण्यास इच्छुक होते. यासाठी त्यांनी अनेक म हिने या मतदारसंघात कामही केले होते.



## काँग्रेस आणि राष्ट्रवादीचा २६११ च्या हल्ल्यामागे अदृश्य हात, भाजपाच्या माधव भांडारींचा आरोप

**मुंबई/प्रतिनिधी :** मोहम्मद अजमल कसाबसह दहा पाकिस्तानी अतिरेक्यांनी मुंबईत २६ नोव्हेंबर २००८ रोजी हल्ला केला. या हल्ल्यामागे काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीचा हात होता, असा आरोप महाराष्ट्र भाजपाचे उपाध्यक्ष माधव भांडारी यांनी केला. स्थानिकांच्या सहभागाशिवाय एवढा मोठा हल्ला होऊच शकत नाही. ज्यांचा हल्ल्यामागे अदृश्य हात होता त्या लोकांना हल्ला होणार असल्याची कल्पना होती, असे माधव भांडारी म्हणाले. दाभोलकर, पानसरे, लंकेश आणि कलबुर्गी या हत्या साखळीद्वारे हिंदुत्ववादी संघटना मोडीत काढण्याचे षडयंत्र आहे, असाही आरोप त्यांनी केला.

गुजरात दंगलीपासून हिंदुत्वाला बदनाम करण्याचे काम सुरू आहे.

देशात राजकीय बदल झाला तरी केवळ तेवढ्याने भागत नाही. सरकार आपले असले तरी व्यवस्था आपली नाही. पोलिस, महसूल, न्यायव्यवस्था अशा सर्व क्षेत्रांत वेगळे लोक आहेत. नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले म्हणजे आपण यशस्वी झालो, असे नाही. व्यवस्था बदलण्याचे मोठे आव्हान आहे; असे माधव भांडारी म्हणाले. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संस्थापक डॉ. नरेंद्र दाभोलकर हत्या प्रकरणात निर्दोष सुटलेले विक्रम भावे यांच्या 'दाभोलकर हत्या आणि मी' या पुस्तकाचे प्रकाशन रविवारी मुंबईत माधव भांडारी यांनी केले. याप्रसंगी सनातन संस्थेचे अभय वर्तक, अ‍ॅड. संजीव पुनाळेकर आणि विक्रम भावे भावे उपस्थित होते.

सत्ता बदलली तरी पोलिस व्यवस्था बदललेली नाही. दाभोलकर हत्या प्रकरणात शिक्षा झालेले शरद कळसकर आणि सचिन अंदुरे निर्दोष आहेत. त्यांची सुटका होईपर्यत स्वस्थ बसणार नाही. आम च्या कामाचा बारामतीच्या काकांना राग होता. यामुळेच अप्रत्यक्षपणे दाभोलकर हत्या प्रकरणात अडकवून हिंदुत्ववादी संघटनेचे कंबरडे मोडण्याचे काम केले गेले अशी टीका अ‍ॅड. संजीव पुनाळेकर यांनी केली. तर महाराष्ट्र अंनिसवर प्रशासक नेमा आणि संघटनेच्या काम ाची तपासणी करा. या संघटनेला नक्षलवादी संघटना म्हणून जाहीर करा, अशी मागणी सनातन संस्थेचे अभय वर्तक यांनी केली.

# मनसे-ठाकरे गटाच्या युतीवर बोलू नका

## मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची निगेटिव्ह सूर असणाऱ्या पदाधिकाऱ्यांना तंबी

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी ठाकरे गटाचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना एकत्र येण्याची साद घातली. यानंतर उद्धव ठाकरेंनी देखील प्रतिसाद दिला. यानंतर गेल्या दोन दिवसांपासून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंच्या एकत्र येण्यावरुन विविध राजकीय चर्चा सुरु आहे. राज्यातील विविध पक्षातील नेत्यांनी देखील ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चांवर प्रतिक्रिया दिली आहे. ठाकरे बंधू एकत्र आले तर आनंदच आहे, असं अनेकजण बोलताना दिसले. मात्र आता राज ठाकरेंनी मनसेच्या नेत्यांना सूचना दिल्या आहेत.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या युतीच्या प्रश्र्नाबाबत २९ तारखेपर्यंत बोलू नका, अशा सूचना राज ठाकरेंकडून देण्यात आल्या आहेत. मनसेचे ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांनी याबाबत एबीपी माझाला माहिती दिली. राज ठाकरे सध्या परदेशात आहेत. त्यामुळे मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या युतीचा विषय संवेदनशील आहे. त्यामुळे २९ एप्रिलपर्यंत कोणीही बोलू नका, अशा सूचना राज ठाकरेंकडून मनसेच्या नेत्यांना देण्यात आल्या आहेत.

मनसेचे नेते संदीप देशपांडे कालपासून माध्यमांशी संवाद साधताना मनसे आणि शिवसेना ठाकरे गटाच्या संभाव्य युतीवर बोलताना दिसले. तसेच मनसेचे नेते यशवंत किल्लेदार आणि अमेय खोपकर यांच्या ट्विटने देखील लक्ष वेधलं होतं. अशी अभद्र युती होऊ नये हीच ईश्र्वर चरणी प्रार्थना, असं ट्विट अमेय खोपकर यांनी केलं होतं. तर मात्र एकत्र येण्यासाठी एक अट देखील उद्धव ठाकरेंनी बोलावून दाखवली. महाराष्ट्र हिताच्या आड जो कोणी येईल, त्याचं स्वागत मी करणार नाही, त्याला घरी मी बोलवणार नाही, त्याच्यासोबत पंक्तीला बसणार नाही, हे आधी ठरवा, असं उद्धव ठाकरे राज ठाकरेंना उद्देशून म्हणाले. त्यानंतर मनसेकडूनही प्रत्युत्तर देण्यात आले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना मनसैनिकांवर दाखल झालेल्या गुन्ह्यांची आठवण संदीप देशपांडेंकडून करण्यात आली. तसेच मनसैनिकांवर गुन्हे दाखल केल्याने उद्धव ठाकरे देखील माफी मागणार का?, असा सवाल संदीप देशपांडे यांनी उपस्थित केला. त्यामुळे मनसेत युतीबाबत नाराजीचे वारे वाहताय की काय?, असं बोललं जात आहे.



CMYK

## बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका

बदलत्या हवामानाचा सर्वच क्षेत्रांना फटका बसत आहे. त्यातही कृषी क्षेत्रावर त्याचा जास्तच परिणाम होताना दिसत आहे. सध्या एप्रिल महिना चालू आहे. सर्वत्र कडाक्याचे ऊन जाणवत आहे. सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या घरात आहे. विदर्भातील काही भागात तर तापमान ४२ ते ४५ अंश सेल्सिअस नोंदवले जात आहे. तापमान वाढल्याने लोकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. कडाक्याच्या उन्हामुळे लोकांना अनेक आजार होत आहेत. या कडाक्याच्या उन्हात लोकांना चक्कर येणे, हृदय विकाराचा झटका येणे, रक्तदाब वाढणे, शरीरातील पाणी कमी होणे, डोळ्यांचे विकार जडणे, लहान मुलांचा घोळणा फुटणे, उष्माघात होणे असे प्रकार घडतात. उष्माघाताने काहींचा जीवही गेला आहे. दोन वर्षापूर्वी खारघर मध्ये घडलेली घटना अजूनही ताजीच आहे. उष्माघातामुळे महाराष्ट्र भूषण पुरस्कार सोहळ्यात १५ श्री सेवेकरांना जीव गमवावा लागला होता. कडाक्याच्या उन्हात जास्तीतजास्त पाणी पिण्याचा सल्ला डॉक्टरांकडून दिला जात आहे. तसेच फळांचा ज्यूस सेवन करण्यास सांगितले जाते. डॉक्टरांकडून दुपारी ११ ते ४ घराबाहेर न पडण्याचा सल्ला दिला जातो मात्र पोटापाण्यासाठी लोकांना घराबाहेर पडावेच लागते. एकीकडे कडाक्याचे ऊन असताना राज्यातील काही भागात मात्र वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पुढील काही दिवस देशातील काही भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. अवकाळी पावसामुळे शेतीचे प्रचंड नुकसान होते. फळबागा जमीनदोस्त होतात. हातातोंडाशी आलेला घास हिरावला जातो. क्षणात होत्याचे नव्हते होते. वर्षभराच्या मेहनतीवर पाणी पडते. अवकाळी पाऊस झाला की बळीराजाच्या काळजाचा ठोका चुकतो. ऐन उन्हाळ्यात अवकाळी पाऊस पडणे ही गेल्या काही वर्षातील नित्याची बाब झाली आहे. जम्मू काश्मीर सारख्या निसर्गाच्या नंदनवनात काल निसर्गाने काल जो प्रकोप दाखवला तो पाहून सगळ्यांच्याच काळजाचा ठोका चुकला. जम्मू काश्मीरमध्ये ढगफुटी झाली. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमध्ये हाहाकार उडाला. क्षणात संपूर्ण प्रदेश जलमय झाला. प्रचंड पाऊस आणि भूस्खलन झाल्याने तीन जनांना आपला जीव गमवावा लागला. या ढगफुटीने जम्मू काश्मीरमधील जनजीवन विस्कळित झाले. शेकडो लोकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावे लागले. तिथे अजूनही बचावकार्य चालू आहे. ऐन उन्हाळ्यात निसर्गाने दाखवलेल्या या उग्र रूपाने सर्वजण आवाक झाले. जम्मू काश्मीरमध्ये अशा प्रकारचा पाऊस यापूर्वी पाहिला नव्हता असे तेथील जुने जाणते लोक सांगत आहेत. केवळ जम्मू काश्मीरच नाही तर देशातील अनेक राज्यात अशाप्रकारचा पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. ईशान्य आणि दक्षिणेकडील काही राज्यात विजेच्या कडकडाटासह पावसाची शक्यता आहे. आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेशात २२ ते २४ तारखे दरम्यान अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे. झारखंड, ओडिशा, पश्चिम बंगाल, आणि छत्तीसगड मध्ये २० ते २४ दरम्यान मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे केरळ, कर्नाटक, लक्षद्वीप, आंध्रप्रदेश, तेलंगणा या दक्षिणेकडील राज्यातही पावसाची शक्यता वर्तवली आहे. म्हणजेच देशातील एका भागात कडाक्याचे उन तर दुसऱ्या भागात मुसळधार पाऊस अशी विषम परिस्थिती आहे. कडाक्याचे ऊन, अवकाळी पाऊस, गारपीट, चक्रीवादळ या घटना आताच घडतात असे नाही तर वर्षभर घडत असतात. महाराष्ट्र हे सह्याद्रीच्या कुशीत वसले आहे. पूर्वी सर्व ऋतूंचे आगमन वेळेवर होत होते. मागील काही वर्षात ऋतुमानात मोठे बदल पाहायला मिळत आहे. ऋतुमानच बदलले आहे. पूर्वी पाऊस फक्त पावसाळ्यातच पडत असे आता वर्षभर कोठेना कोठे पाऊस पडताना दिसतो. पावसाळ्यात दोन दोन महिने पाऊस पडत नाही. कधीकधी दोन दिवस इतका पाऊस पडतो की दोन दिवसात दोन महिन्याची सरासरी भरून काढतो. त्यामुळे कोणत्या ऋतूत कोणते पीक घ्यावे याबाबत शेतकरी संभ्रमात असतो. बदलत्या हवामानामुळे काहींनी शेती करणेच बंद केले आहे. राज्यात मागील काही वर्षात मोठ्या प्रमाणात जंगलतोड वाढली आहे. काँक्रीटीकरण वाढले आहे. शहरे सिमेंटचे जंगले बनली आहेत. पर्यावरणाचा ऱ्हास झाला आहे. त्यामुळे वातावरणात बदल होत आहे. वातावरणातील बदलामुळे या घटना घडत आहेत. निसर्गाच्या या बदलत्या चक्राचा मानवजातीवरच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीवरच परिणाम होत आहे. लोकांनी यातून धडा घेऊन आतापासूनच निसर्ग नियमाने जगणे सुरू करायला हवे. वृक्षतोड थांबवली पाहिजे, जंगलतोड थांबवली पाहिजे. वृक्षलागवड करून ती जगवली पाहिजेत. माणसाने निसर्गावर केलेले आक्रमण थांबवले पाहिजे. जर माणसे निसर्ग नियमाच्या विरुद्ध गेले तर त्याची मोठी किंमत येणाऱ्या पिढीला मोजावी लागेल.

# तेव्हा लागलेली आग आज पण आहे

## मंत्री संजय शिरसाट यांची शिवसेनेवर टिका

**दैनिक आपला विदर्भ**

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राज ठाकरे यांनी महाराष्ट्र हितासाठी एकत्र येण्याची हाक दिली, मात्र त्याला प्रतिसात उबाठा ने दिलेला नाही.संजय राऊत यांचे कार्टून पाहिल्यावर तुम्हाला हसायला येईल आणि आम्ही केलेल्या उठावामुळे त्यांच्या मागे लागलेली आग दाखवत आहे. ते त्याचा आहे की, त्याचा नेत्याचा आहे माहित नाही. मात्र, तेव्हा लागलेली आग आज पण आहे. अशी टिका मंत्री संजय शिरसाट यांनी उबाठा शिवसेनेवर केली. यावेळी ते म्हणाले की, राज ठाकरे यांचा काय संदेश आहे,हे कळते याची जाणीव आहे, आम्ही आज ही नाते टिकविले आहे. आम्ही संदेश न समजायला दूध खुळे नाही. तुम्ही युती करा. आत्महत्या करण्याची वेळ कुणावर आली हे कळेल. ही चांडाळ चौकडी लोक कधीच युती होऊ देणार नाही. युती झाल्यास अस्तित्व संपेल ही त्यांना भीती आहे. राज ठाकरे यांनी कुणाचा ही सपोर्ट नसताना पक्ष मोठा केला आणि सांभाळला. सत्तेसाठी प्रत्येकाच्या दारोदार फिरणारे लाचार तुम्ही. लाचारांची फौज तयार झाली सल्याने पक्षाची ही अवस्था आहे. काँग्रेस राष्ट्रवादी सोबत रहा, ते तुम्हाला लाथा मारतील. काँग्रेस आणि राष्ट्रवादी सोबत जाण्याचा तुम्हाला पश्चात्ताप झाला आहे. अजित पवार आणि शरद पवार हे एकत्र आले तर आश्चर्य वाटायला काही नाही. ते भविष्यात एकत्र येण्याचे त्यांनी संकेत दिले आहेत. एकदा एकत्र येऊ द्या, त्यांना जाहीर करू द्या. अंदाज बांधणे चुकीचे आहे.टीका करणारा रोहित पवार रोज अजित पवार यांच्या पाया पडतो. संजय राऊत यांना मुजरा घालायची सवय लागली आहे.आशिष शेलार युतीकडे चांगल्या भावनेने पाहतो.मात्र, ते एकत्र येणार नाहीत. राजकीय फायदा घ्यायचा असता तर, घेतला असता. मात्र, त्यांच्या जवळच्या लोकांनी घेऊ दिला नाही. भुजबळ यांनी लढणे थांबवावे. त्यांनी अनेक लढाई जिंकल्या आणि हरल्या. राज ठाकरे यांना कधी नाकारलेलं ? खंबीरपणे उभा राहणारे राज ठाकरे होते. त्यांचे योगदान आहे आणि ते रक्ताचे मासाचे आहे. भाऊ आणि चुलत भाऊ यांना बाजुला केले.



एकनाथ शिंदे त्यांनी गांभीर्याने घेतले नाही.राहुल गांधी यांना देशाची बदनामी करण्याचा झटका येत असतो. मुद्दामून आपल्या देशाला बदनाम करतात. प्रदेशात जाऊन भारताचे नाव कसे डाउन करायचे हा प्रयत्न राहुल गांधी यांनी केला.राज्यात ५०० टँकर नाही तर, जास्त आहेत. टँकर वाढले तरी, हरकत नाही, पण पाणी मिळाले पाहिजे.शेतकऱ्यांना फसवले नाही. शेतकऱ्यांना जे होईल ते देण्याचा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याची भूमिका ही आहे. दीड कोटी रुपये पैशातून हेलिपॅड लागतात. हे आश्चर्य आहे. मोठा आकडा सांगून विषय वाढवण्याचा प्रयत्न आहे. एवढा पैसा खर्च केला असेल तर चुकीचे आहे. दीड कोटी लागण्याचा प्रश्न नाही. मुख्यमंत्री साहेब पाणी प्रश्न गंभीर असून,त्यांनी आयुक्तांना ही विचारले आहे. मूळ परिस्थिती चांगली व्हावी, यासाठी मुख्यमंत्री यांनी बैठक आयोजित केली आहे. हे आंदोलन करतात आणि पाणीच टेंडर घेतात. पवार ठाकरे मातोश्री सोडल्यापासून त्यानंतर यांचे कधी मनोमिलन झाले नाही. उद्धव ठाकरे यांनी कायम खुनशीने पाहिले.पवार कुटुंब हे विविध कार्यक्रमात येतात, त्यांनी राजकारण बाजुला ठेवून कुटुंबाला महत्त्व दिले. राज ठाकरे यांच्या वर उद्धव ठाकरे यांनी केलेली टीका ते कधी विसरणार नाहीत. उद्धव ठाकरे हा युतीचा अडथळा. यांना धोका वाटतो. सत्तेत राहणे पवार कुटुंबाचे धोरण आहे. दोन ठाकरे एकत्र आल्यास पेढे वाटू, आम्हाला काही धोका नाही. आमच्या सत्तेला कुठेही धक्का लागणार नाही. औरंगजेब शंकराचार्य यांच्या भूमिकेला आमचे समर्थन आहे. हा विषय संभाजी महाराज यांच्या पुरता मर्यादित नाही, तर इतर राज्याना देखील त्रास दिला. आम्ही औरंगजेब हटवण्याचा प्रयत्न करतो, हे जलील ला घरात घेतात. उपमुख्यमंत्र्यांना आईचे पत्र ज्यामुळे हे घडले त्याला अटक होईल. टोकाचे पाऊल उचलण्या आधी आमच्याशी संपर्क साधा आम्ही मार्ग काढू. हिंदी संस्कृत भाषा एखाद्या गोष्टीवर आंदोलन सुरू झाल्यावर अनेक भाषिक सहभागी होतात. पक्ष वाढण्यासाठी लोक येणे महत्त्वाचे आहे. मात्र, जुन्या लोकांना डावलून इतरांना मोठे करणे योग्य नाही. परिस्थिती पाहून ताट वाढवावे लागते. मुळ कार्यकर्त्याला डावलून जमत नाही.असे मत सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी व्यक्त केले.

# चांदवड तालुक्यातील ९० ग्रामपंचायतीची अनूसूचित जाती, जमाती, नागरीकांचा मागासप्रवर्ग सोडत जाहीर

**दैनिक आपला विदर्भ**

**नाशिक/प्रतिनिधी :** चांदवड तालुक्यातील ९० ग्रामपंचायतीच्या दि. ५ मार्च २५ ते दि. ४ मार्च २०३० या कालावधीत मुदत संपणा:या ग्रामपंचायती करीता सुधारीत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती , नागरीकाचा मागास प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गाकरीता ग्रामपंचायत निहाय सरपंच आरक्षण निश्चीत करणो, व निश्चीत केलेल्या सरपंच आरक्षणातून महिलासाठी अनूसूचित जाती, जमाती, नागरीकांचा प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील माहिलांसह राखुन ठेवण्याची कार्यवाही करण्यासाठी तालुक्यातील या नव्वद ग्रामपंचायतीच्या सदस्य, नागरीक स्थानीक स्वराज्य संस्थेचे सदस्य, पदाधिकारी यांनी सोमवार दि. २१ एप्रिल २५ रोजी दुपारी बारा वाजता चांदवड तहसीलदार कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारत सभागृहात तहसीलदार मंदार कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली अनुसूचित जाती, अनूसूचित जमाती , नागरीकांचा मागासप्रवर्ग आरक्षण सोडत काढण्यात आली.



यावेळी गटविकास अधिकारी मच्छिंद्र साबळे, नायब तहसीलदार विजय कचवे , दिलीप मोरे आदि उपस्थित होते. प्रथम चांदवड तालुक्यातील सोग्रस, सुतारखेडे, भडाणो, देवरगाव, दहयाणो, धोंडबे या सहा ग्रामपंचायतीसाठी अनुसूचित जाती आरक्षण आतार्पयत न आल्याने तेथे आरक्षण जाहीर करण्यात आले. तर अनुजमाती साठी बारा ग्रामपंचायतीमध्ये शिंगवे, तळवाडे, भोयेगाव, सोनीसांगवी, हिरापूर दिघवद, वाहेगावसाळ, डोंगरगाव, उसवाड, चिंचोले, कातरवाडी, दहीवद या ग्रामपंचायतीमध्ये अनूसूचित जमातीचे आरक्षण जाहीर करण्यात आले. तर नागरीकांचा मागासवर्ग प्रवर्ग ( ओबीसी) साठी पुर्वीचे जाहीर झालेले मंगरुळ, भुत्याणो, कानडगाव, कुंदलगाव, राजदेरवाडी, वाघदर्डी, खेलदरी, निमगव्हाण, ही गावे नागरीकांचा मागासवर्गीय प्रवर्ग झाली तर २१ गावाच्या एकत्रीत चिठय़ा एका बरणीत टाकण्यात आल्या व त्या चिठठय़ा मधून लहान बालक स्वामी युवराज आहेर, त्रिवेणी सागर कोतवाल यांच्या हस्ते १६ चिठय़ा काढण्यात आल्यात. त्यात वाद, नांदुरटेक, राहुड, गोहरण, भयाळे, निंबाळे, खडकजांब, आडगाव, वडाळीभोई, दुगाव, मेसनखेडेखुर्द , पाथरशेंबे, बहादुरी, तळेगावरोही, कोकणखेडे, साळसाणो आदि चिठय़ा काढल्या आहेत. तर उर्वरीत ४८ ग्रामपंचायती या सर्वसाधारण आरक्षण निघाले त्यात कानमंडाळे, डोणगाव, न्हनावे, परसुल, बोराळे, शिंदे, शेलु, कळमदरे, चिखलांबे, तिसगाव, दुधखेडे, धोंडगव्हाण, निमोण, भाटगाव, रायपूर, वडबारे, वाकीखुर्द, शिवरे, हट्टी, पारेगाव, वडगावपंगु, शिरुर, खडकओझर, रेडगाव, पन्हाळे, पाटे, मालसाणो, विटावे, हरनुल, हिवरखेडे, नारायणगाव, शिरसाणा, आसरखेडे, काळखोडे, पुरी, गंगावे, वाकी बुर्दक, वडनेरभैरव, जोपुळ, पिंपळनारे, दहेगाव मनमाड, उधरुळ, गणूर, अहिरखेडे, काजीसांगवी, बोपाणो, दरेगाव, पिंपळद अदि गावे सर्वसाधारण आरक्षण निघाले आहेत. यासंदर्भात चांदवड तहसीलदार मंदार कुलकर्णी यांनी अधिक माहिती दिली.

## सलमान खाननंतर आता टीव्ही अभिनेत्रीच्या पतीला धमकी! बिश्नोई गँगच्या रडारवर?

**मुंबई/प्रतिनिधी :** अभिनेता सलमान खाननंतर आता प्रसिद्ध टीव्ही अभिनेता अभिनव शुक्ला याला जीवे मारण्याच्या धमक्या आल्याची माहिती समोर आली आहे. ही धमकी लॉरेन्स बिश्नोई गँगच्या नावाने देण्यात आली असून, अभिनवने स्वतः सोशल मीडियावर स्क्रिनशॉट शेअर करत याचा खुलासा केला आहे.

अभिनव शुक्ला, जो प्रसिद्ध अभिनेत्री रुबिना दिलैकचा पती आहे, याला सोशल मीडियावरून धमकीचे मेसेज मिळाले. एका ''अंकुश गुप्ता'' नावाच्या प्रोफाइलवरून आलेल्या मेसेजमध्ये म्हटलं आहे की, ''मी लॉरेन्स बिश्नोईचा माणूस आहे. सलमानच्या घरी गेलो, तसंच तुमच्याकडे येऊन -४७ ने गोळी घालीन.'' या धमकीमध्ये अभिनव, त्याची पत्नी रुबिना आणि अभिनेता असीम रियाझ यांच्यात '' या रिॲलिटी शो दरम्यान झालेल्या वादाचा संदर्भ दिला गेला आहे. धमकी देणाऱ्याने पुढे लिहिलंय ''असीमबद्दल काही बोललात तर तुमचं नाव टार्गेट यादीत जाईल. लॉरेन्स बिश्नोई असीमच्या पाठीशी आहे.''

अभिनवने ही माहिती इंस्टाग्राम स्टोरी आणि एक्सवर शेअर करत संबंधित स्क्रीनशॉट आणि धमकी देणाऱ्याचा प्रोफाइल उघड केला. त्याने सांगितले की, ही व्यक्ती छत्तीसगढ किंवा माहोली येथील असावी. त्याने छत्तीसगढ आणि पंजाब पोलिसांना टॅग करत याप्रकरणी तात्काळ आणि कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

# राज्याचे सामाजिक परिवर्तन घडविणारा कार्यक्रम

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची पत्रकार परिषदेत माहिती

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** आज पिंक इरिक्षा वाटपाचा कार्यक्रम पार पडला आहे.आजचा हा कार्यक्रम महत्वाचा आहे. राज्याचे सामाजिक परिवर्तन घडवणारा आहे. या कार्यक्रमातून खूप काही साध्य होणार आहे.अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुणे येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते म्हणाले की,आहिल्यादेवी होळकर यांचे मोठे स्मारक त्यांच्या मूळ गावी चौंडीला करत आहोत. त्यांची ३०० वी जयंती यंदा साजरी करत आहोत. छत्रपती संभाजी महाराज यांचे स्मारक, महात्मा फुले यांचे स्मारक अशी अनेक स्मारक आपण स्थापन करत आहोत. छत्रपती ताराराणी यांची ३५० वी जयंती देखील यंदा आहे, त्यांनाही अभिवादन करण्यात आले. महिला आणि बालकांसाठी नरेंद्र मोदी अनेक योजना राबवत आहेत.



राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली देखील अनेक योजना आम्ही राबवत आहोत. ८० कोटी रुपये पहिल्यांदा मी या कामासाठी मंजूर केले होते. विधानसभा निवडणुकीच्या आधी आम्हाला ही योजना राबवायची होती. चांगल्या कंपनीकडून आम्ही या रिक्षा घ्यायच ठरवले होते. महिलांचे अभिनंदन करतो. ही योजना महिलांना ठोस अशा प्रकारचा प्रेरणादायी कार्यक्रम देण्याची आहे. महिलांना सक्षम करायच आहे, महिलांना आम्हाला बळकट करायच आहे.महिला सबलीकरण करायच आहे. महिला आणि मुलींनी रिक्षाने जाताना या पिंक रिक्षाचा विचार करावा. तुम्ही जर पुरुषाला रिक्षामध्ये बसवले तर, त्याचा फोटो काढायचा आणि तुमच्या घरी पाठवून द्यायचा की, आता मी या ग्रहकाला घेऊन चालले आहे. जर, त्या ग्राहकांनी काय गडबड केली, तर त्याचा पुरावा आपल्याकडे राहील. आम्ही सगळे पुरुष गडबड करणारे नाहीत.

परंतु, काही वेगळ्या विचारांचे लोक असतात. काही लोक विकृत असतात. त्यामुळे करणे हे गरजेचे आहे. महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणायचे काम आम्ही करत आहोत.राज्यात लाडक्या बहिणी विधानसभेला आमच्या पाठिशी विश्वासाने उभ्या राहिल्या. आम्हाला खूप मोठा पाठिंबा मिळाला.आम्ही महिलांच्या पाठिमागे मजबुतीने उभे आहोत. अनेकजण आमच्यावर आरोप करतात की, उद्याच्या काळात आमचे हे सगळे कार्यक्रम बंद पडतील.

लाडक्या बहिणीचा निधी देणार नाहीत, पण मी आज सगळ्यांना सांगतो की, राज्य सरकारने जी लाडकी बहीण योजना सुरू केली आहे, ती महिलांच्या सन्मानासाठी कोणत्याही परिस्थितीमध्ये ज्या महिला त्याला लाभामध्ये बसतात, त्या महिलांना कधीही हा निधी बंद होऊ देणार नाही. कुणाला काय अफवा उठवायच्या आहेत ते उठवूद्या, ही योजना बंद होणार नाही. लोकसभेच्या वेळी देखील अफवा उठवली गेले, की हे संविधान बदलतील पण असं नव्हते आपल संविधान जगात श्रेष्ठ आहे. अस संविधान आम्ही बदलणार नाही. असे मत यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### नियोजन नसल्याने ठाणेकरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे - संजय केळकर



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** ठाणे शहरामध्ये उंच उंच इमारती वाढत आहेत आणि या इमारतींना महानगरपालिका वापर परवाना देखील देत आहे. हा वापर परवाना जर थांबवला आणि उंच इमारती बांधकाम त्याचप्रमाणे बेकायदा इमारतींचे बांधकाम थांबवले तर आणि तरच ठाणे शहरातील पाण्याचा प्रश्न तूर्तास मार्गी लागू शकतो. ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अनेक विविध प्रकल्प सुरू आहेत. या प्रकल्पांच्या बांधकामाला देखील मोठ्या प्रमाणात पाणी लागते. ते पाणी टँकरद्वारे पुरवले जाते आणि म्हणून घोडबंदर भागात सध्या नागरिकांना पिण्यासाठी टँकरने पाणी पुरवले जात असताना त्यावर देखील ताण पडत आहे. नियोजन नसल्याने ठाणेकरांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. हे संपूर्ण बांधकामे बंद करावी, त्यांना पाणी देणे बंद करावे आणि सद्यस्थितीमध्ये राहत असलेल्या नागरिकांना पुरेसे पाणी द्यावे, अशी मागणी संजय केळकर यांनी केली आहे.

### ठाकरे बंधू एकत्र आले तर मराठी माणसाला यश येईल; शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे यांची प्रतिक्रिया

दैनिक आपला विदर्भ

**डोंबिवली/प्रतिनिधी :**ठाकरे बंधू एकत्र आले तर, महाराष्ट्रात आणि मराठी माणसासाठी यश असेल, असे मत डोंबवली शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले. यावेळी ते म्हणाले की, मोठागाव गावदेवी चॅरिटेबल ट्रस्ट माजी महापौर पुंडलिक म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली कुस्त्यांच्या स्पर्धेचे आयोजन. राज्यातील विविध ठिकाणाहून कुस्तीपटूंचा सहभाग पाहायला मिळाला. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे दोन्ही पक्ष एकत्र आले तर, सगळ्यांना आनंद होईल.याची भूमिका पक्षप्रमुख उद्धव ठाकरे घेतील.शिवसेना हा पक्ष नेहमीच जनतेच्या विषयांसाठी पुढे असलेला पक्ष आहे. परंतु, येत्या काळात भाजप आणि सरकारचे ज्या पद्धतीने राजकारण सुरु आहे, आताच्या काळाची गरज आहे. दोन्ही भाऊ एकत्र आले तर, महाराष्ट्रात आणि मराठी माणसासाठी यश असेल, असे मत डोंबवली शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हा प्रमुख दीपेश म्हात्रे यांनी व्यक्त केले.

### विदर्भवाद्यांकडून महाराष्ट्र दिनाचा करणार निषेध; विदर्भ राज्य आंदोलन समिती १ मे रोजी काळा दिवस पाळत करणार धरणे




दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** केंद्र सरकारने विदर्भाचे स्वतंत्र राज्य तात्काळ निर्माण करावे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमुक्ती करावी, अन्नधान्यावरील जीएसटी तात्काळ रद्द करावा, कापूस आणि सोयाबीन पिकाला सरकारने भावांतर द्यावे यासह अन्य मागण्यांसाठी विदर्भ राज्य आंदोलन समितीच्यावतीने १ मे रोजी महाराष्ट्र दिनाचा निषेध करत काळा दिवस पाळणार आहे. तर जिल्हा जिल्ह्यामध्ये तहसील आणि जिल्ह्याच्या ठिकाणी काळ्या पट्ट्या, काळा गणवेश, काळी टोपी व काळा स्कार्फ किंवा दुपट्टा लावून महापुरुषांच्या पुतळ्यांसमोर महाराष्ट्र दिनाचा निषेध करणार असल्याची माहिती विदर्भ राज्य आंदोलन कृती समितीचे नेते तथा माजी आमदार ॲड. वामनराव चटप यांनी आज बुलढाण्यात पत्रकार परिषदेत दिली आहे.

### शेअर बाजारातील तेजीचा ट्रेंड कायम,सेन्सेक्स-निफ्टीमध्ये उसळी, गुंतवणूकदारांची ६ लाख कोटींची कमाई

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय शेअर बाजारात सलग पाचव्या दिवशी म्हणजेच सोमवारी (२१ एप्रिल) तेजी पाहायला मिळाली. सेन्सेक्समध्ये सकाळच्या सत्रात १००० अंकांपेक्षा अधिक अंकांची वाढ झाल्याचे दिसून आले. निफ्टी ५० ने देखील २४ हजारांचा टप्पा ओलांडला. सर्वच क्षेत्रामधील स्टॉक्समध्ये जोरदार खरेदी पाहायला मिळाली. बीएसई सेन्सेक्स ८५५.३० अंकांच्या तेजीसह ७९४०८.५० अंकांपर्यंत पोहोचला. तर निफ्टी ५० निर्देशांक २७३.९०अंकांनी वाढून २४१२५.५५ अंक इथंपर्यंत पोहोचला.

# जग कुठे चालले आणि तुम्ही कबरीच्या मागे फिरताय

## आमदार विजय वडेट्टीवार यांची भाजपवर टिका

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** सनातन म्हणत आहेत आणि भाजप सत्तेत आल्यापासून सगळ्यात जास्त गोमांस एक्सपोर्ट होत आहे. ह्या प्रकरणात किती वाढ झाले याचे उत्तर आम्ही मागितले. तर, त्यांना दुःख वाटेल. त्या धंद्यात कोणता पक्ष आता नाही आहे. अशा प्रकारचे आरोप करण्यापेक्षा कारवाई करा, तसेच सगळेच ऐतिहासिक स्थळ पाडून टाका, आज नव्याने जग कुठे चालले आहे आणि तुम्ही कबरीच्या मागे फिरताय, काम सोडून, धंदे सोडून, शेती शेतमजूर सोडून कबरीच्या मागे लागत आहात. अशी टिका काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत भाजपवर केली.

यावेळी ते म्हणाले की,अलीकडे शरद पवार आणि अजित पवार, ठाकरे बंधू खूप चर्चा सुरू आहेत. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा सुरु असल्यामुळे पवार एकत्र येणार अशी चर्चा असू शकते. निव्वळ एकत्र येण्यासाठी नाही. तर, भेटीगाठी कामासाठीही असू शकतात. अकरा वर्षे झाले दिल्लीपासून गल्लीपर्यंत तुमची सत्ता आहे. कोणी अडवले तुम्हाला, तुम्ही ही सगळी चौकशी करून पुरावे असतील तर, कारवाई करा. सत्ता आहे, पावर आहे.त्याचा उपयोग करा आणि राष्ट्रविरोधी ताकद आहे, ते शोधून काढा. सनातन म्हणत आहेत आणि भाजप सत्तेत आल्यापासून सगळ्यात जास्त गोमांस एक्सपोर्ट होत आहे. ह्या प्रकरणात किती वाढ झाले याचे उत्तर आम्ही मागितले. तर, त्यांना दुःख वाटेल. त्या धंद्यात कोणता पक्ष आता नाही आहे.

अशा प्रकारचे आरोप करण्यापेक्षा कारवाई करा, सगळेच ऐतिहासिक स्थळ पाडून टाका, आज नव्याने जग कुठे चालत आहे आणि तुम्ही कबरीच्या मागे फिरताय, काम सोडून, धंदे सोडून, शेती शेतमजूर सोडून कबरीच्या मागे लागत आहात. कबर खोदणार पुन्हा दोन धर्मात तेढ निर्माण होईल. भांडणे होतील आणि मतांची पोळी खाता येईल. हा उद्देश त्यांचा कदाचित असेल,शंकराचार्यांचे म्हणणं छत्रपती शिवरायांचा शौर्य लपवण्याचा व पडदा टाकण्याचा प्रयत्न आहे. असा प्रश्न निर्माण होतो. देवेंद्र फडणवीस योगी यांच्या पावलावर चालायचे की,कोणाच्या पावलावर चालायचे, सध्याचे पावले दिल्लीच्या दिशेने जात असतील तर, ते योगींच्या पावलावर जाऊन मिळेल. ते स्वतः च्या हे देवेंद्र फडणवीस ठरवतील. आम्हाला वाटत होते की, भुजबळ मुख्यमंत्री होतील.उपमुख्यमंत्री पद



मिळाले नाही,ओबीसींना महायुती सरकारने दाखवून दिले दाखवायचे आणि खायचे दात कसे वेगळे आहेत. त्यामुळे त्यांच्या वेदना स्वाभाविक आहेत. त्यांची लढाई ओबीसीसाठी असेल, तर आम्ही सोबत आहोत. दाभोळकरांची हत्या कोणी केली.

आरोपी पकडलेले आहेत. त्यामुळे हे पुस्तक लिहिले यांना काय साध्य करायचं आहे? ते पुस्तकात काय आहे, नेमके ते मला माहित नाही. पुस्तक खून करण्याच्या बाजुने आहे, की दाभोलकर ? कोणाच्या बाजुने ते मला माहिती नाही. संदीप पात्रा हे खरं आहे की, यांचे पद्धत चुकीची माहिती द्यायची, अशा प्रकारचे स्टेटमेंट करायचे, वातावरण खराब करण्याची नेहमीची पद्धत राहिली आहे. राहुल गांधींनी कधी स्टेटमेंट केली, मोठ्या लोकांनी याबाबत भूमिका मांडली आहे. जर ईव्हीएममध्ये घोटाळा होऊ शकतो. तर, निवडणूक आयोग त्याचा उत्तर का देत नाही.उपमुख्यमंत्री व्यस्त असतील, कुंभमेळा नाशिकमध्ये आहे. कुंभमेळा असताना नाशिकमध्ये पाण्यासाठी वणवण चालली आहे. कुंभ मेळ्यासाठी पाच हजार कोटी खर्च करणार आणि एक महिला पाण्यासाठी वणवण करते, कसला हा कुंभ मेळा साजरा करतात. दाखवण्यासाठी कुंभमेळ्याचा देखावा करत आहे.

सत्ताधारीचे म्हणतील तोच न्याय, एका आमदाराच्या हट्टापायी जुन्या केसेसमध्ये आमदाराचे लोक त्यामध्ये सापडले आहेत. ५०० शिक्षक भरती प्रकरणात सापडले आहेत. २०१९ ते २०२३ पर्यंत प्रकरण झालेल आहे, आणि २०२३ मध्ये जे अधिकारी ते पदावर आले त्यांच्यावर आरोप करत आहेत. उपमुख्यमंत्री बीडचे पालकमंत्री आहेत.

बीड हातातून गेला आहे, एका निवृत्त अधिकाऱ्याने सांगितले, की बीडमध्ये नवीन गाडी घेतली. तर, ती नजर पडली तर खंडणी मागायला जातात. आम्ही म्हटले तर, बीडला बदनाम करण्याचा आरोप आमच्यावर होतात. ठेचून काढा गुंडागर्दी, एका निष्पाप महिलेला न्याय देऊ शकत नाही. भाजप आमदार आहे, नागपुरातील त्याच्या इशाऱ्यावर हे कारवाई झाली आहे. ज्या माणसाने सर्व तक्रारी केल्या, त्या सर्व तक्रारी त्यांनी केलेल्या तक्रारी आहेत. मग तक्रारदाराला चोर ठरवायचे सायबरमध्ये ज्या प्रकरणात त्याला अडकवले ते तक्रारी त्या अधिकाऱ्याने केला आहे. हा बोगसपणा केलेला आहे, शालार्थ आयडीचा वापर करून भरती झाली आहेत. यामध्ये अनेक सत्ताधाऱ्यांच्या संस्था आहेत. त्यांच्यावर कारवाई होऊ नये, म्हणून चोर सोडून संन्याशाला फाशीचा उलट न्याय आहे. संचालक पदासाठी नरड हा पात्र होता, म्हणून ओबीसी माणसाला हिरावले आहे. आमदाराने केले आहे, मी नाव सांगेल माझ्याकडे पुरावे येत आहेत. त्याचे नाव घेऊन पुरावे उघड करणार. अशी माहिती काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार पत्रकार परिषदेत दिली.

## ब्रह्माकुमारीज संस्थेच्या माजी मुख्य प्रशासिका
# दादी रतनमोहिनी यांना श्रद्धांजली

### सर्वांच्या सहयोगाने ब्रह्माभोजनाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

**रिसोड/प्रतिनिधी :** प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय रिसोड च्या संचालिका राजयोगिनी ब्रह्माकुमारी ज्योती दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २० एप्रिल २०२५ रविवारी संस्थेच्या माजी मुख्य प्रशासिका आदरणीय राजयोगिनी ब्रह्माकुमारी रतन मोहिनी दादी जी यांच्या स्मृतीनिमित्त सेवा संस्थेच्या सर्व ज्ञानार्थीनी ब्रह्मा भोजनाचे आयोजन केले होते. दादी रतनमोहिनी यांचे आठ एप्रिलच्या सकाळी एक वाजून वीस मिनिटांनी त्यांच्या वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले होते. दादी रतनमोहिनी यांनी वयाच्या तेराव्या वर्षी ब्रह्माकुमारी संस्थेशी आयुष्य समर्पित त्यानंतर वयाचे ८७ वर्ष त्यांनी सतत ब्रह्माकुमारी संस्थेच्या माध्यमातून देश विदेशात सेवा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करून ब्रह्मकुमारीज संस्थेच्या विकासात, प्रगतीत व भरभराटीत महत्त्वपूर्ण योगदान दिले. रिसोड सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी विशेष स्मृति सभेचे आयोजन करण्यात आले होते संचालिका ब्रह्माकुमारी ज्योती दीदींनी दादीच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पित करुन श्रद्धांजली अर्पित केली तर ब्रह्माकुमारी गीता दीदी सह सर्व उपस्थित ज्ञानार्थीनी दादी रतनमोहिनीजी यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून श्रद्धांजली अर्पित केली. प्रसंगी ज्योती दीदींनी दादी रतनमोहिनी यांच्या सेवा काळातील महत्वपूर्ण व प्रेरणादायी घटनाक्रमावर प्रकाश टाकला



दादी सतत ४० वर्ष ब्रह्माकुमारी युवा विंगच्या प्रमुख राहिल्या त्यांच्या कार्य काळामध्ये अनेक युवकांना संघटित व प्रोत्साहित करण्याचे कार्य संपूर्ण देशभर करण्यात आले. त्यांच्या नेतृत्वात निघालेल्या युवा पदयात्रेची नोंद लिमका बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये करण्यात आली.

दादिनी जवळपास ७०हजार किलोमीटर पदयात्रा काढून सव्वा करोड लोकांना शांती, प्रेम, एकता, सौदार्ह, विश्वबंधुत्व, अध्यात्म, व्यसनमुक्ती आणि राजयोग मेडिटेशन चा संदेश दिला त्यामुळे करोडो लोकांच्या जीवनात अमूलाग्र बदल झला. ब्रह्माकुमारी ज्योती दीदींनी दादी रतनमोहिनी यांच्या जीवनपटाचे अवलोकन करुन स्व उन्नती साधन्याचे उपस्थित सर्व ज्ञानार्थी भाऊ बहिणींना आवाहन केले. सर्वांच्या सहयोगाने दादीच्या स्मरणार्थ ब्रह्माभोजनचे आयोजन करण्यात आले होते. प्रसंगी रिसोड सेवा केंद्रासह तालुक्यातील गीता पाठशाळेचे भाऊ बहिणी मोठया संख्येने उपस्थित होते.




### राज ठाकरे शाळकरी मुलांप्रमाणे कोणत्याही अटी शर्थी मान्य नाही करणार - मंत्री उदय सामंत

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** राज ठाकरे यांची ती मुलाखत दीड महिन्यापूर्वीची असून शाळकरी मुलांप्रमाणे कोणत्याही अटी शर्थींवर राज ठाकरे तडजोड करतील असे मला वाटत नाही. राज ठाकरे यांचा विचार आहे. ते आपल्या मतावर ठाम असतात. यांना जितक ओळखतो त्यांना झुकवून युती होऊ शकेल असे वाटत नाही. यांच्या अटी काय तर देवेंद्र फडणवीस यांना बोलायचे नाही. एकनाथ शिंदे यांना पाहायचे नाही. अशा कुठल्या अटी शर्थी पुढे झुकून राज ठाकरे युती करतील असे वाटत नाही. आम्ही राज ठाकरेंना भेटलो ते साहित्य संमेलनात त्यांच्या उपस्थितीचे आभार मानण्यासाठी, यात कोणताही राजकीय विषय नव्हता.

# कबरीचा विषय हा पुरातत्व खात्यातंर्गत ते निर्णय घेतील : माजी मंत्री छगन भुजबळ

## पत्रकार परिषदेत अनेक प्रश्नांवर भाष्य

दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** शंकराचार्य वक्तव्य कबर काढा, असे आहे. मात्र, भारतीय पुरातत्व खात्या अंतर्गत हा विषय येतो त्या वर ते निर्णय घेतील. अशी माहिती माजी मंत्री छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी ते म्हणाले की, अजित पवार आणि शरद पवार भेट ही साखर प्रश्नावर आणि इतर विषयांवर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात बैठक होतात. सामाजिक प्रश्न सोडवण्याची ते नेहमीच एकत्र येतात. संजय राऊत म्हणत असतील तर, आनंदाची गोष्ट आहे. विभागलेले कुटुंब एकत्र आले तर, मलातर आनंदच होईल. राजकीय मतभेद असू शकतात. मात्र, कुटुंबामध्ये दुरावा नको,लढता लढता मी समाजसेवा देखील करत असतो. बाळासाहेब ठाकरेंनी देखील हेच सांगितले आहे. जोपर्यंत अंगात शक्ती आहे,तोपर्यंत लढत राहीन. दाभोलकर यांची हत्या झाली तेव्हा आरोपी लवकर सापडत नव्हते काही सापडले काही नाही,काही चुकीची गोष्ट घडत असेल तर, ते मुख्यमंत्री पाहतील. अमित शहा यांना तटकरे यांनी जेवण्याचे आमंत्रण दिले.तिथे जाण्यासाठी हेलिपॅड तयार करावे लागतात. कुंभमेळा कामांबाबत मुख्यमंत्री आणि इतर अधिकारी लक्ष घालत आहेत. कुंभ मेळ्याला येणाऱ्या लोकांसाठी सोयी सुविधा तयार केली जाणार आहे ते अभ्यास पूर्वक झाले पाहिजे, मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे.त्यामुळे त्याचा अपमान करायचे नाही,असे सगळ्या जणांनी सांगितले. हिंदी भाषेचा सक्ती नको कुणाला शिकायची असेल तर,त्यांनी शिकावी,संस्कृत भाषा देखील ज्यांना शिकायची त्यांनी शिकावी, तर, उन्हाच्या प्रचंड तिव्रतेने प्रचंड पाणी टंचाई निर्माण झाली आहे. उन्हाची तीव्रता खूप वाढली आहे. पिण्यासाठी प्रथम पाणी दिले पाहिजे, बंधन असताना देखील पाणीसाठा असलेल्या विहरीतून पाणी शेतीसाठी वापरले जात असल्याचे माजी मत्री भुजबळ म्हणाले.



# पुणे येथील आरोग्य टीम बोंडगावात दाखल

## शेगाव तालुक्यातील नखं गळती प्रकरण

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील खामगाव, शेगाव,नांदुरा, या तीन तालुक्यात टक्कल व्हायरसने दहशत निर्माण होती आता शेगाव तालुक्यातील बोंडगाव येथील भागात नागरिकांचे आता नख गळतीचे प्रकार समोर आल्याने नागरिक भयभीत झाली आहे. केस गळती नंतर नका गतीचे प्रकार समोर आल्याने पुणे येथील वैद्यकीय टीम तालुक्यातील गुंड गावात दाखल झाली आहे.

मात्र हा प्रकार कशामुळे होत आहे. हे अद्याप उघड केले नसल्याने नागरिक चिंतेत आहे.सदर प्रकार कशामुळे होत आहे. याबाबत वैद्यकीय टीम शोध घेत



असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. शेगांव, खामगाव, नांदुरा या भागात चार ते पाच महिन्यापूर्वी नागरिकांचे डोक्याचे केस गळून टक्कल पडले जात होते.

सदर प्रकार हा कोणत्या कारणाने होत होता याबाबत नागरिक चिंतेत असताना या प्रकाराने एकच खळबळ उडाली होती. आरोग्य यंत्रणा कामाला लागली एवढेच नव्हे तर, टक्कल व्हायरसच्या उपायोजना करण्याकरिता थेट केंद्राने हस्तक्षेप केल्यानंतर आयसीएमआरची ॲलोपॅथिक होमिओपॅथिक आणि आयुर्वेदिक टीम या भागात येऊन नमुने घेऊन गेली आहे. आता नख गळती होत असल्याने नागरिकही नव्या चिंतेत पडले आहे.

### लवकरच निष्कर्ष काढून उपाययोजना केल्या जातील

शेगांव तालुक्यातील बोंडगावसह परिसरातील गावात सुरुवातीला केस गळती आणि आता नागरिकांच्या नख गळतीने शेगांव तालुक्यातील बोंडगाव या गावांमध्ये खळबळ उडाली आहे. मागील पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या हा प्रकार आरोग्य विभागाला अद्यापही थांबविता आलेले नाही. दरम्यान आज आरोग्य विभागाच्या पुणे येथील जॉईन डायरेक्टर डॉ. बबिता कमलापूरकर यांनी या गावात भेट दिली. यावेळी नखं गळती झालेल्या बाधित रुग्णांची त्यांनी चर्चा केली. महत्त्वाचे म्हणजे तीन महिन्यांपूर्वी केस गळतीमुळे हे गाव प्रकाश झोतात आले होते. दरम्यान दिल्ली येथील आयसीएमआर च्या पथकाने हे या गावात पोहोचून केस, नखं अन्नधान्य, पाणी रक्तांचे नमुने घेऊन गेले होते. मात्र, त्याचा अहवाल प्राप्त झाला नसल्याने आचार्य व्यक्त होत असतानाच आता नख गळतीचे रुग्णासमोर येत असल्याने आरोग्य प्रशासन खडबडून जागे झाले आहे.नख गळती बाबत तपासण्या सुरू करण्यात आलेले आहेत. उद्याही गावांमध्ये दिल्लीचे आरोग्य पथक दाखल होणार आहेत. गावकऱ्यांना घाबरून जाण्याचे कारण नाही. लवकरच निष्कर्ष काढून उपाययोजना केल्या जातील.अशी माहिती पुणे येथील आरोग्य विभागाच्या जॉइंट डायरेक्टर डॉ. बबीता कमलापूरकर यांनी दिली.

# पाण्यासाठी महिलांचा ग्रामपंचायत कार्यालयावर धडक मोर्चा

दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** गावात पिण्याच्या पाण्याची भीषण टंचाई निर्माण झाल्याने सर्व कामधंदे सोडून महिलांना पाण्यासाठी वन वन भटकंती करण्याची वेळ आली आहे गावातील पाणीटंचाई दूर करावे गावात पिण्याच्या पाण्याची किमान सुविधा निर्माण करावी यासाठी जिल्ह्यातील देऊळगाव घुबे गावील संतप्त महिलांनी ग्रामपंचायतवर कार्यालयावर हंडा मोर्चा आपला रोष व्यक्त केला. त्याचबरोबर गावात पिण्याच्या पाण्याची सुविधा करण्याची मागणी करण्यात




आली. पाणी समस्या निकाली न निघाल्यास बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशाराही संतप्त महिलांनी दिला आहे.

देऊळगाव घुबे गावात भीषण पाणीटंचाई असल्याने महिलांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे.भर उन्हात १ ते २ किलोमिटर अंतरावरून डोक्यावर हंडा घेऊन पाणी आणावे लागत आहे. ग्रामपंचायत ने पिण्याच्या पाण्याचे कोणतेही नियोजन केले नसल्याचा आरोप गावकरी करत आहेत. एक महिन्यापासून नळ आले नसल्याचे महिलांचे म्हणणे आहे. आम्ही करपट्टी, नळपट्टी भरतो. मग आम्हाला पाणी का नाही, असं सवालही ग्रामस्थांनी उपस्थित केलाय. ग्रामपंचायतीच्या या नियोजनशून्य कारभारामुळेच पाणीटंचाईचा सामना करावा लागत असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे. या कारभाराला वैतागून आज संतप्त महिलांनी ग्रामपंचायत वर हंडा मोर्चा काढला. पाणी समस्या मिटवली नाही तर ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण करू असा इशारा महिलांनी दिला आहे.

# कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण

## स्थानिक तक्रार समितीतील अध्यक्ष, सदस्य पदासाठी अर्ज आमंत्रित



दैनिक आपला विदर्भ

**बुलडाणा/प्रतिनिधी :** कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियमानुसार, जिल्हा स्तरावर ''स्थानिक तक्रार समिती'' स्थापन करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हास्तरावरील स्थानिक तक्रार समितीमधील अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती करण्यासाठी इच्छुक पात्र व्यक्तीकडून दि. २९ एप्रिल २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हा महिला व बालविकास अधिकारी तथा स्थानिक तक्रार समितीचे सदस्य सचिव यांनी दिली.

अध्यक्ष पदाकरीता पात्रता : अर्जदार किमान पदवीधर असावा, केवळ महिला व्यक्ती अध्यक्षपदासाठी अर्ज करून शकेल, महिलांच्या सोयीसाठी बांधील असावे. तसेच सामाजिक कार्याचा ५ वर्षाचा अनुभव असावा. अशासकीय अध्यक्षाचा कालावधी नेमणूकीपासून ३ वर्षाचा राहील. सदस्य पदाकरीता पात्रता : महिलांच्या सोयीसाठी बांधील असलेल्या अशासकिय संघटना, संघ किंवा लैंगिक छळाच्या प्रश्नांशी परिचित असलेली व्यक्ती यामधून दोन सदस्य नामनिर्देशीत करावयाचे आहेत. त्यापैकी किमान एक सदस्य महिला असावी, कायद्याची पार्श्वभूमी असलेला असावा. तसेच किमान एक सदस्य, अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती किंवा इतर मागासवर्ग किंवा अल्पसंख्यांक समाजातील महिला असावी.

इच्छूक पात्र व्यक्तिनी आपले शैक्षणिक पात्रता, कामाविषयीचा अनुभव व संमतीपत्र समितीच्या अध्यक्ष व सदस्य या पदावर नियुक्ती करणेबाबतचा अर्ज जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, बस स्टैंडच्या मागे मुठ्ठे ले आऊट डॉ. जोशी नेत्रालय बुलढाणा या कार्यालयास सादर करावे, असे प्रसिद्धीपत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# वर्धा जिल्ह्यातील पाच गावांचा व्याघ्र प्रकल्पात समावेश : पालकमंत्री पंकज भोयर यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**वर्धा/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील गरमसूर, मरकसूर, एनीदोडका, मेटहिरजी, उमरविहिरी या पाच गावांचा बोर व्याघ्र प्रकल्पात समावेश करण्यात आला आहे. अशी माहिती पालकमंत्री पंकज भोयर यांनी माध्यमांशी बोलताना दिली. यावेळी ते म्हणाले की, महाराष्ट्र वन्यजीव मंडळाच्या चोवीसव्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. मान्यता मिळाल्याने या पाच गावांचा पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. अनेक वर्षांपासुन ही गावांना वन्यजीवांचा होता धोका तो आणि अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मागणीला मान्यता मिळाल्याने गावकरी आनंदित झाले आहेत. मागील आठवड्यात झालेल्या बैठकीचा प्रोसिडींग लवकर येणार असून नागरिकांच्या सोईप्रमाणे लवकर



पुनर्वसन होणार असल्याची माहिती पालकमंत्री पंकज भोयर यांनी दिली. तर, या व्याघ्र प्रकल्पात पाच गावांचा समावेश् केल्याबद्दल वर्ध्याच्या स्थानिक विश्राम गृहात पालकमंत्र्यांचा गावकऱ्यांनी सत्कार केला आहे. मागील दहा वर्षांपासून हे गावे वन्य प्राण्यांच्या मोठ्या दहशतीत होते. गावात ये-जा करण्याची अडचण होती. सोबतच गाव आमच्यासाठी हे सेंट्रल जेल बनले होते.मात्र, आता प्रश्न सुटल्याने आनंदित असल्याची भावना यावेळी गावाकऱ्यांनी व्यक्त केली.अशी माहिती पालकमंत्री पंकज भोयर यांनी दिली.

## काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांनी घेतली अतिरिक्त पोलिस अधीक्षकांची भेट

दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** अमरावती नागपूर राष्ट्रीय महामार्गावर तिवसा पोलीस स्टेशन हद्दीत पोलिसांच्या वाहनाच्या धडकेत जितू अळसपुरे या तरुणाचा



मृत्यू झाल्याचा आरोप काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर व काँग्रेस खासदार बळवंत वानखडे यांनी केला आहे. यशोमती ठाकूर व बळवंत वानखडे यांनी अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांची भेट घेत पोलिसांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी केली, सोबतच रस्ता बनवणाऱ्या कंपनीत वर देखील गुन्हे दाखल करा अशी मागणी करण्यात आली, या अपघातात सीसीटीव्ही फुटेज समोर आले आहे, या सीसीटीव्ही मध्ये स्पष्टपणे दिसत आहे की पोलीस गाडीने धडक दिल्यानेच जितू अडसपुरे यांचा मृत्यू झाला, तसेच अपघातात मृत्यू पावलेल्या अळसपुरे यांच्या पत्नीला आर्थिक मदत द्यावी अशी मागणी देखील यशोमती ठाकूर यांनी केली.

# विधान भवन परिसरातील कामाचा आढावा

## विधानपरिषदचे सभापती राम शिंदे यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** आज विधान भवन परिसरातील कामाचा आढावा घेतला. १४ विषयावर चर्चा झाली.अशी माहिती विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी बोलताना ते म्हणाले की, सियाबर्डी येथील भूखंड आहे. ९७७० भूखंड विधिमंडळास हस्तांतरण करण्याचा काम केल आहे.विधान भवन समोरील हॉटेलची जागा खरेदीच्या अनुषंगाने चर्चा झाली, पण चर्चा संपलीं नाही. बांधकामाच्या अनुषंगाने फेरमूल्यांकन करण्याच्या सूचना दिल्या आहेत. विधान भवनात पूर्ण क्षमतेने ४३ पैकी ४१ मंत्री आहे. त्यांना जागा उपलब्ध करून



देण्याचा अनुषंगाने जागा उपलब्ध करून दिली आहे. समित्या उपलब्ध होणार आहेत, यात पार्लिमेंटमध्ये वाढणारी लोकसभा सदस्य संख्या वाढणार असून, पुढील काळात विधानसभा जागा वाढणार आहे. त्यासाठी कंपोझिट प्लॅन आणि प्रशासकीय जागा वाढवण्यासाठी प्रस्ताव मागावला आहे. १९४५ नंतर विस्तार झाला नाही. त्यामुळे पूर्ण एफएसआय वावरून विचार करण्याचा अनुषंगाने काम सुरू आहे. रवी भवन येथे १२ सूट आहेत. अधिवेशनापुरते वापरत असल्याने ते इतरवेळी उपलब्ध करून देणाचा अनुषंगाने विचार केला जाणार आहे. आमदारांचा विकास अनुषंगाने प्रस्ताव मागवला आहे. यात विधांनमंडळ अखत्यारीत येऊन यासाठी काम करणार आहे.

१६० खोल्या असल्याने भविष्यात अधिकरी आणि असणारी संख्या खोल्या बांधण्यासाठी सूचना केल्या आहेत. विद्युत व्यवस्था करण्यासाठी सूचना केल्या आहेत.याबरोबरच झिरो माईल, आणि फॉरेस्ट जागा असून विधानभवन आणि मोठी वस्तू तयार होण्यासाठी वस्तुस्थिती अहवाल मागवला आहे. शासकीत मुद्रणालय हा महाराष्ट्र राज्याचा भाग आहे. आता नवीन मशिनरी इंस्टॉल करण्याचे काम सुरू आहे. पुरातत्व विभागात बेकायदेशीर कामकाज होणार नाही, हेरीटेज जागा असेल असे काम होणार नाही. एम कुमार जागेच्या अनुषंगाने बैठका झाल्या, त्या जागेसाठी मूल्यांकन हे मान्य नसल्याने व्यवहार दृष्टीने हा प्रस्ताव करणार आहे. आमदार निवासाठी नुतनीकरण करण्याचा विचार आहे. नवीन बिल्डिंग बांधताना हेरीटेज बिल्डिंग कायम राहील.अशी माहिती विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी दिली.

## बोधगया महाविहार बुद्धांच्या ताब्यात देण्यासाठी देशभरात आंदोलन; केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांची पत्रकार परिषदेत माहिती

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त मी अमेरिकाला होतो. युनायटेड ऑफ नेशनने मला आमंत्रित केले होते.अमेरिकाच्या नागरिकांची मागणी आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे म्युझियम व्हावे, यासाठी आम्ही नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची



भेट घेणार आहे.बोधगया महाविहार बुद्धांच्या ताब्यात द्या, अशी आमची मागणी आहे.यासाठी रिपब्लिकन पक्ष हा देशभरात आंदोलन करेल. अशी माहिती केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ते म्हणाले की, राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्रित येतील असं मला वाटत नाही. आले तरी, उद्धव ठाकरे यांना महविकास आघाडीतून बाहेर पडावे लागेल. राज ठाकरे यांच्या मागणीला आमचा विरोध आहे. हिंदीला विरोध हे योग्य नाही.हिंदी ही आमची राष्ट्रभाषा आहे. त्यामुळे राज ठाकरे यांना आमचे समर्थन नाही. दादागिरी करून मागणी धरून लावणे हे योग्य नाही.असे मत केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले.